जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५७७ दिनांक -२५/०७/२०२३**

मुंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

# बिट मार्शलचे कर्तव्य तत्परतेमुळे... कसबापेठ, पुणे परिसरात राहणारी रस्ता चुकलेली ७० वर्षीय वयोवृद्ध महिला कुटूंबिया समवेत सुखरूप

मुंढवा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे दिनांक २४/०७/२०२३ रोजी मुंढवा बिट मार्शल पोलीस अंमलदार, देवानंद खाडे व संदीप गर्जे हे गस्त करीत असतांना एक वयोवृद्ध आजी वय अंदाजे ७० वर्षे हि मुंढवा चौक येथे अस्ताव्यस्त, घाबरलेल्या सारखी फिरत असल्याचे दिसले. तेव्हा पोलीस अंमलदार देवानंद खाडे यांनी आजीच्या जवळ जावून मायेने मदत हवी आहे काय याबाबत विचारणा केली. सदर वेळी आजीने काहीएक न बोलता, फक्त पाहतच राहिली व डोळे पाणावले तेव्हा पोलीस अंमलदार देवानंद खाडे यांचे लक्षात आले, आजी वाट चुकली आहे तेव्हा आजीस नाव व राहण्याचा पत्ता विचारला असता, नाव बेबी, राहणार कसबा एवढेच सांगितले. आजीजवळ अचुक ओळख पटविण्याकरीता मोबाईल फोन, ओळखपत्र, नाव पत्ता बाबत काहीएक चिज वस्तू नसल्याने पुढील कार्यवाही करीता मुंढवा पोलीस चौकी येथे आणले.

सदर घटनेचे माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे यांना मिळताच वयोवृद्ध आजी राहण्याचे ठिकाण कसबा असे सांगत असल्याने तात्काळ फरासखाना पोलीस ठाणेस संपर्क करुन फोटो पाठवून वर्णन कळविणे बाबत सांगितले. तेव्हा आजीचे नातेवाईक देखील आजीचा शोध घेत असल्याची माहिती प्राप्त झाली. आजीचे नातेवाईक यांना संपर्क नंबर प्राप्त करुन मुंढवा पोलीस ठाणे येथे बोलावून घेतले. आजीचे जावई रा. ४७६, कसबा पेठ, पुणे हे समक्ष मुंढवा पोलीस ठाणेस हजर राहून ओळखून आजीचे संपुर्ण नाव बेबी मरीयम अन्सारी, वय ७० वर्षे, रा. ४४०, कसबा पेठ पुणे असे असल्याचे सांगितले. योग्य खात्री झाल्याने आजीस जावई यांचे ताब्यात सुखरुप देण्यात आले आहे. आजीचे जावई यांनी पोलीसांचे या तत्पर कामगिरी बद्‌ल कौतुक करुन पुणे शहर पोलीस दलाचे आभार मानले आहेत.

सदरची कामगिरी, मा.पोलीस उप-आयुक्त, श्री.विक्रांत देशमुख परिमंडळ-५ पुणे शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त, श्रीमती आश्विनी राख, हडपसर विभाग पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली, मुंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे यांचे सुचानाप्रमाणे पोलीस अंमलदार देवानंद खाडे, रमेश उगले, संदीप गर्जे यांनी केली आहे.

